# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक

# अंतःशुद्धीचे सोपान

## *उद्धरण १०*

तुम्ही तुमच्या अस्तित्वाला शुद्ध कसे करू शकता? साध्याशा गोष्टींपासून सुरुवात करा. सर्वप्रथम, आपल्या कर्मांची शुद्धी करा. जेव्हा एखादा विचार उद्भवतो, तेव्हा त्यावर कृती करण्याआधी क्षणभर थांबा. तो जर पोषित करणारा विचार नसेल, तर त्याला परत चितीमध्ये लय होऊ द्या. दुसरे म्हणजे, अशुद्ध कर्मांबद्दल असलेली तुमची खोटी आसक्ती तोडून टाका. जर एखाद्या मित्राने तुमच्या वागणुकीविषयी असा एखादा अभिप्राय दिला, जो तुम्हाला आवडला नाही, तर तो लगेच झिडकारू नका. त्याच्यामधील ईश्वराचा आवाज ऐका. जरी तुम्हाला तो विशिष्ट सल्ला वा टीका वा सूचना स्वीकारायची नसेल, तरी ती बाजूला सारू नका. तिच्यावर चिंतन करा. ईश्वर अनेक मुखांद्वारे बोलतो. शेवटी, एका निकोप अनुशासनाचा विकास करा. आपल्या इंद्रियांवर, आपल्या सवयींवर, आपल्या भावसंवेगांवर आणि आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय २ ‘अस्तित्वाची शुद्धी,’ यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. २९-३०.